**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ६.०० )**

**बुधवार दिनांक ८ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

**1. मुंबईतील भुयारी मेट्रो हे विकसित होणाऱ्या भारताचं जिवंत प्रतिक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन**

**2. दिल्लीत आज ९व्या इंडिया मोबाइल काँग्रेसचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन**

**3. पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाचा दिलासा, परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय**

**4. त्रिभाषा धोरणाबाबत जनमत आणि सूचना एकत्रित करण्यासाठी प्रश्नावली ऑनलाईन उपलब्ध आता सविस्तर बातम्या ......**

---

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

मुंबईतील अंडरग्राउंड मेट्रो हे विकसित होणाऱ्या भारताचं जिवंत प्रतिक असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ -एन. एम. आय. ए आणि मुंबई मेट्रो लाईन-3 च्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन आज मोदी यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते उपस्थितांना संबोधित करत होते-

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी - ३६ सेकंद )***

***आज मुंबई का लंबा इंतजार खत्म हुआ। मुंबई को अब अपना दूसरा इंटरनेशनल एअरपोर्ट मिल गया है ये एअरपोर्ट इस क्षेत्र को एशिया के सबसे बड़े कनेक्टिविटी हब के रूप में साबित करने में बड़ी भूमिका निभाएगा आज मुंबई को पूरी तरह से अंडरग्राउंड मेट्रो भी मिली है इससे मुंबई में ट्रैवल और आसान होगा लोगों का समय बचेगा यह अंडरग्राउंड मेट्रो विकसित होते भारत का जीवंत प्रतीक है।***

सुमारे 19 हजार 650 कोटी रुपयांच्या खर्चाने उभारलेला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबईकरांसाठी अत्यंत महत्त्वाचं असल्याचं पंतप्रधान म्हणाले. या उद्घाटन कार्यक्रमात पंतप्रधानांसोबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे उपस्थित होते. हे विमानतळ 'डी. बी. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' या नावाने ओळखले जाईल. N M I A हा भारतातील

सर्वात मोठा ग्रीनफील्ड विमानतळ प्रकल्प आहे. लोकल, मुंबई महानगर परिसरातल्या सर्व मेट्रो, मोनो, बेस्ट तसंच मुंबई महानगर क्षेत्रातल्या सर्व महापालिका क्षेत्रातल्या बस सेवेचं तिकिट एकाच ॲपवरून काढता येणाऱ्या मुंबई वन ॲपचं लोकार्पणही पंतप्रधानांच्या हस्ते झालं. आयटीआय आणि तंत्रनिकेतन मधल्या अल्पकालीन अभ्यासक्रमांनाही पंतप्रधानांच्या उपस्थितीत सुरुवात झाली.

-----------------------------------------

**पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबई दौरे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज तंत्रशिक्षणातील अल्पकालीन अभ्यासक्रमांचं देखील उदघाटन करण्यात आलं. या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व आय टी आय मध्ये देखील शॉर्ट टर्म कोर्सेस सुरू झाले आहेत. नागपुरातील संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था इथं उद्योग संरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ देखील आभासी पद्धतीद्वारे मोदी यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रशिक्षण संस्थेत १७ अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

-----------------------------------------

**विजय वडेट्टीवार**

देशाचे पंतप्रधान हे दोन दिवसीय मुंबई दौऱ्यावर आहेत. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे उद्घाटन सोहळे पार पाडले जात आहेत. पंतप्रधान महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असताना शेतकऱ्यांसाठी मोठ्या पॅकेजची घोषणा करावी ,अशी मागणी कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली - होल्ड बाईट २२ सेक

***(होल्ड बाईट - विजय वडेट्टीवार २२ सेकद )***

***डिसेंबरची डेड लाईन आहे मग आतापासून आताच का एवढा उद्घाटन केले पाहिजे तर त्यामध्ये महानगरपालिकेच्या निवडणुका आहेत. याचा फायदा घेण्यासाठी या उद्घाटन आयोजन केलेला आहे आणि त्या इव्हेंटमधून मत घेण्यासाठी केलेली युक्ती आहे असा याचा अर्थ होतो. दुसरी गोष्ट की आता आलेच महाराष्ट्रात तर भरभरून पॅकेज देऊन जा. शेतकर्यांसाठी महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडू नका.***

नवी मुंबई विमानतळाचे काम अपूर्ण आहे, डिसेंबरपासून या विमानतळावरून उड्डाण होणार आहेत, अशा वेळी अपूर्ण राहिलेल्या कामाचे उद्घाटन हे फक्त श्रेय घेण्यासाठी सुरू आहे, अशी टीका देखील वडेट्टीवार यांनी केली.

-----------------------------------------

**कीर स्टार्मर**

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांचं आज मुंबईत आगमन झालं. ते आजपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांनी स्टार्मर यांचं छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्वागत केलं. यावेळी  उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते. कीर स्टार्मर यांची ही पहिलीच भारत भेट आहे. उद्या ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. तसंच मुंबईत फिनटेक फेस्ट इथं देखील उपस्थित राहणार आहेत

---------------------------------------------

**इज ऑफ डुईंग बिझनेस**

राज्य सरकार इज ऑफ ड्यूइंग बिसनेस धोरण राबवत आहे. या माध्यमातून गुंतवणूकदारांच्या समस्या लवकर सोडविणे हे  शासनाचं  धोरण आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक उद्योगस्नेही राज्य असून दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध असल्याचं प्रतीपदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं . मुंबईतील  हॉटेल ताज पॅलेस इथं आज मुख्यमंत्री फडणवीस यांनी ब्रिटिश शिष्टमंडळाची भेट घेतली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील गुंतवणूक वातावरण, पायाभूत सुविधा आणि भावी विकास आराखड्याबाबत सविस्तर माहिती दिली.

---------------------------------------------

**मोदी दूरसंचार**

दूरसंचार क्षेत्रात देशाचं यश आत्मनिर्भर भारताच्या दृष्टीकोनाची ताकद दर्शवतं, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत आज नवव्या इंडिया मोबाइल काँग्रेसचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. एकेकाळी 2G मध्ये अडचणींचा सामना करणाऱ्या या देशात आता जवळजवळ प्रत्येक जिल्ह्यात 5G कव्हरेज आहे, देशातली डिजिटल कनेक्टिव्हिटी आता प्रत्येक भारतीयाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी ३१ सेकंद )***

***इंडिजिनियस टेक्नोलॉजीज का डेवलपमेंट और स्केलिंग हो, RND  के जरिये इंटलेक्चुअल प्रॉपर्टी क्रिएट करना हो ग्लोबल स्टैंडर्ड के डेवलपमेंट में कंट्रिब्यूट करना हो, भारत हर आयाम में आगे बढ़ रहा है। इन्हीं प्रयास ओं का परिणाम है कि आज भारत एक इफेक्टिव प्लेटफॉर्म बनकर उभरा है साथियों, इंडिया मोबाइल, कांग्रेस और टेलीकॉम सेक्टर में भारत की सफलता आत्मनिर्भर भारत के विजन की ताकत को बताता है)***

गुंतवणूक, नवोपक्रम आणि मेक इन इंडियासाठी ही सर्वोत्तम वेळ असून, भारत आता जगातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा दूरसंचार आणि 5G बाजार बनला असल्याचं त्यांनी सांगितलं.

-------------------------------------------

**परीक्षा शुल्क माफ**

राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस झाला आहे. पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी पुरामुळे कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य वाहून गेलेल्या एकाही विद्यार्थ्याचं शिक्षण बाधित होणार नाही, याची दक्षता घेतली जात असून परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सोबतच शैक्षणिक संस्थांनीही सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं आहे.आज मंत्रालयात राज्यातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा आढावा घेण्यासाठी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

-------------------------------------------

**जीएसटी**

वस्तू आणि सेवा परिषदेनं जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. नव्या कररचनेमुळे अनेक वस्तू, पदार्थ स्वस्त झाल्यान ग्राहकांना याचा फायदा होणार आहेच, शिवाय राज्यांच्या अर्थव्यवस्थेलाही मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. गृहिणी ज्योति पाखरे यांनी या बाबत आपलं मनोगत व्यक्त केलं -

***(होल्ड बाइट - गृहिणी ज्योती पाखरे - २४ सेकंद)***

***रोजच्या लागणाऱ्या जीवनाआवश्यक वस्तू मध्ये जो बदल घडून आलेला आहे त्याच्यामुळे आमच्या खिशाला जी कात्री लागत होती ती आता कमी लागणार आहे. त्यामुळे माझी येणारी जी दिवाळी आहे. मी खूप आनंदात आणि खूप उत्साहात साजरी करेल. त्याचबरोबर उरलेले जे काही आमचं बजेट जो आहे त्याच्यामध्ये मी माझ्या मुलांचीही करू शकतेआणि जे काही दुसऱ्या काही जीवनावश्यक वस्तू लागेल त्याचीही खरेदी करू शकते.***

-------------------------------------------

**त्रिभाषा धोरण समिती**

राज्यातील शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने त्रिभाषा धोरण सुनिश्चित करण्यासंदर्भात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. समितीच्या कामकाजाच्या अनुषंगाने tribhashasamiti.mahait.org हे अधिकृत संकेतस्थळ उपलब्ध करण्यात आलं आहे. संकेतस्थळावर त्रिभाषा धोरणाबाबत जनमत आणि सूचना एकत्रित करण्यासाठी एक प्रश्नावली प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. यासाठी सर्व नागरिकांनी

या संकेतस्थळाला भेट देऊन प्रश्नावलीमधील माहिती भरावी, आपले मत आणि सूचना नमूद कराव्यात, असं आवाहन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे उपसंचालक संजय डोर्लीकर यांनी केलं आहे.

-------------------------------------------

**बाबू छत्री हत्या**

“झुंड” चित्रपटातील अभिनेता प्रियांशू उर्फ बाबू छत्रीची नागपुरात हत्या झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना नागपूरच्या जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घडली . याप्रकरणी ध्रुव शाही नावाच्या आरोपीला अटक केली आहे.परस्पर वैमनस्यातून आरोपीने प्रियांशुचा गळा वायरने चिरून निर्घृणपणे हत्या केल्याचे सांगण्यात येत आहे.प्रियांशुने ‘झुंड’ या चित्रपटात अमिताभ बच्चनयांच्यासोबत अभिनय केला असून चित्रपटात ‘बाबू’ हे पात्र साकारले होते.

-------------------------------------------

**ओबीसी आरक्षण**

प्रत्येक समाजाला त्यांच्या हक्काचे आरक्षण मिळाले पाहिजे. मराठा समाजाच्या स्वतंत्र आरक्षणाला आमचा पाठिंबा आहे पण ओबीसीमधून आरक्षण द्यायला मात्र सकल ओबीसी संघटनांचा विरोध आहे. याच भूमिकेतून विदर्भातील सकल ओबीसी संघटनांनी १० ऑक्टोबर रोजी नागपूर इथे महामोर्चाचे आयोजन केले आहे.

-------------------------------------------

**सुवर्णमहोत्सवी प्रयोग**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संघाचे तीन प्रथम सरसंघचालक यांच्या कार्यावर आधारित द्विअंकी नाटक ‘संघ गंगा के तीन भगीरथ’ चा सुवर्णमहोत्सवी प्रयोग 14 ऑक्टोबर रोजी रात्री 7.30 वाजता रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई इथं होणार आहे. या विशेष प्रयोगाचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती दिग्दर्शक संजय पेंडसे यांनी दिली. हा प्रयोग नागपूरच्या राधिका क्रिएशन्स तर्फे सादर करण्यात येईल.

-------------------------------------------

**धनुष्यबाणचिन्ह**

शिवसेना पक्षाचं नाव आणि निवडणूक चिन्हासंदर्भात उद्धव ठाकरे यांच्या याचिकेवर येत्या १२ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. शिवसेना हे पक्षाचं नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या गटाला देण्याच्या

निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती.

-------------------------------------------

**हवामान**

गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यात आज विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उर्वरित विदर्भात मात्र हवामान सामान्य राहणार आहे.

-------------------------------------------